''विदर्भातील विविध संस्था, मंडळे, दले यांचे भारतीय स्वातंत्र्य चळवळीत योगदान : एक ऐतिहासिक अभ्यास'' (१८८५-१९४७)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड मानव्यविद्याशाखे अंतर्गत इतिहास विषयातील पीएच.डी. पदवीसाठी सादर करावयाच्या संशोधन प्रबंधाचा

संशोधन आराखडा

संशोधक

जिवन आसाराम तुपकर

मार्गदर्शक

डॉ. जी. एस. पिसे

सहाय्यक प्राध्यापक

इतिहास विभाग,

ज्ञानोपासक महाविद्यालय, परभणी

एप्रिल - २०१९

''विदर्भातील विविध संस्था, मंडळे, दले यांचे भारतीय स्वातंत्र्य चळवळीत योगदान - एक अभ्यास'' (१८८५-१९४७)

प्रास्ताविक :

आधुनिक भारताच्या इतिहासातील भारतीय स्वातंत्र्य चळवळ अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. भारतीय स्वातंत्र्य चळवळ ही सर्वात मोठी लोक चळवळ होती. तीच्यामध्ये लाखो स्त्री-पुरूष, जात-पात, उच्च निच ही स्वतंत्र ओळख विसरून एकत्र आले. या चळवळीचे एक लक्षणीय वैशिष्ट्य म्हणजे भारतातील विविध संस्था, मंडळे, दले इत्यादींचा उत्साहपूर्ण सहभाग होय.

ब्रिटिश जेव्हा भारतात आले त्यावेळेस भारतीयांची स्थिती अतिशय दयनिय होती. भारतात रूढी, परंपरा, कर्मकांड, जातीव्यवस्था, बालविवाह, कन्यावद्य, विधवा पुर्नविवाह बंधने, बहुपत्नीत्व, सक्तीचे वैधव्य, पडदा पद्धत ही मोठ्या प्रमाणात होती, त्यांच्या मध्ये स्वातंत्र्याची व राजकीय हक्काची जाणीव नव्हती. हीच स्थिती विदर्भाची होती त्यावेळेस ब्रिटिशांनी एकोणिसाव्या शतकापासून पाश्चात्य शिक्षण व विज्ञानाचे ज्ञान देण्यास सुरूवात केली. त्यामुळे भारतीय सुशिक्षीत लोक आत्मपरीक्षण करू लागले. त्यांनी समाजात असणाऱ्या दोषाचा शोध घेऊन समाजाची सर्वांगीण उन्नती करण्यासाठी व स्वातंत्र्याची व राजकीय हक्काची जाणीव होण्यासाठी ग्रामीण व शहरी भागात विविध संस्था, मंडळ, दले यांची स्थापना झाली. त्यांनी विदर्भात मोठ्या प्रमाणात प्रबोधन करून स्वातंत्र्य चळवळीत सहभाग घेतला.

विदर्भ प्रांतात प्रामुख्याने वऱ्हाड सार्वजनिक सभा, चरखा संघ, खामगाव येथील राष्ट्रीय शाळा, भगिनी मंडळ, प्रांतिक युद्ध मंडळ, हिंदुस्थानी सेवा दल, गौरक्षण सभा, अजुमन - इ-इस्लाम, वनिता समाज, महिला समाज, सरस्वती मंडळ, ग्राम संरक्षक दल, खादी भांडार, नाटक मंडळ इत्यादींचा समावेश होतो. विदर्भातील या सर्व संस्था मंडळे व दले यांनी राजकीय जागृती, सामाजिक उन्नती घडवून आणली. त्यामुळे विदर्भात मोठ्या प्रमाणात स्वातंत्र्य चळवळ सक्रीय होऊन भारताला स्वातंत्र्य मिळाले.

संशोधनाची उद्दिष्ट्ये :

१. विदर्भातील विविध संस्था, मंडळे, दले, यांचा शोध घेणे.

२. विदर्भातील विविध संस्था, मंडळे, दले यांचे प्रबोधन कार्य अभ्यासणे.

३. विदर्भातील संस्था, मंडळे, दले, यांचे स्वातंत्र्य चळवळीतील योगदान अभ्यासणे.

४. विदर्भातील स्त्रियांनी स्थापन केलेले संस्था, मंडळे, दले यांचा चिकित्सक अभ्यास करणे.

५. विदर्भातील सामाजिक, शैक्षणिक व राजकीय संस्था ग्रामीण मंडळे, दले यांच्यावर प्रकाश टाकणे.

संशोधनाची गृहितके :

१. विदर्भातील संस्था, मंडळे, दले, यांची प्रबोधन करून सामाजिक जागृती व राजकीय हक्काची जाणीव निर्माण केली.

२. विदर्भातील संस्था, मंडळे, दले, यांनी स्वातंत्र्य चळवळीत सहभाग घेऊन भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यात महत्त्वाचे योगदान आहे.

३. ग्रामीण भागात विविध संस्था, दले, स्थापन झाल्यामुळे स्वातंत्र्य चळवळ जनसामान्यापर्यंत पोहचली.

४. स्त्रियांनी विविध संस्था, मंडळे, दले, यांच्या माध्यमातून सामाजिक प्रबोधन करून, स्वातंत्र्य चळवळीत मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला.

परिकल्पना :

भारतीय स्वातंत्र्य लढ्यात राष्ट्रीय काँग्रेसच्या कार्यात पूरक भूमिका निभावून जनजागरण तसेच प्रबोधन घडवून आणण्यामध्ये विदर्भ विभागातील संस्था, मंडळे, दले इ. मोठी कामगिरी करून स्वातंत्र्य प्राप्तीमध्ये महत्त्वपूर्ण योगदान दिले.

संशोधन पद्धती :

प्रस्तुत संशोधनात प्राथमिक आणि दुय्यम साधन सामुग्रीचा आधार घेण्यात येणार आहे. यामध्ये मुलाखती, वृत्तपत्रे, संशोधन पत्रिका इतिहासग्रंथ, गॅझेटिअर, Home special Departmental File, Political and Military Department File

मासिके, साप्ताहिके, पाक्षिक, गौरवग्रंथ, आठवणी संशोधनपर लेख, वृत्तपत्रीय लेख इत्यादी स्त्रोतांचा उपयोग करून संशोधन केले जाणार आहे.

संशोधन विषयाची निवड व महत्त्व :

आधुनिक भारताच्या इतिहासातील भारतीय स्वातंत्र्य चळवळ अतिशय वैशिष्ट्यपूर्ण आहे. या चळवळीमध्ये विदर्भातील ग्रामीण व शहरी भागात जनतेने विविध संस्था, मंडळे, दले स्थापन करून स्वातंत्र्य मिळविण्यासाठी प्रयत्न केले. या संस्था, मंडळे व दले यांनी ग्रामीण भागात स्त्री-पुरूषामध्ये जागृती करून भारतीय स्वातंत्र्य चळवळीला लोक चळवळीचे स्वरूप, प्राप्त करून दिले. सामाजिक, शैक्षणिक व राजकीय संस्था, मंडळे, आणि दले यांनी विदर्भातील जनतेमध्ये प्रबोधन करून स्वातंत्र्य चळवळीला व्यापक स्वरूप प्राप्त करून देऊन भारताला स्वातंत्र्य मिळवून दिले. परंतु खऱ्या अर्थाने ग्रामीण व शहरी भागातील विविध संस्था, मंडळे व दले यांचा सर्वांगीण अर्थाने अभ्यास झाला नाही. म्हणून त्यांच्या कार्यावर प्रकाश टाकणे महत्त्वाचे आहे.

संदर्भ साधनांची उपलब्धता :

सदर विषयाच्या संशोधनासंबंधित संदर्भ ग्रंथाचा दर्जा असलेले प्रसिद्ध ग्रंथ, साप्ताहिक, वर्तमानपत्र, संशोधन पत्रिका, पाक्षिक, आठवणी, संशोधनपर लेख, अभिलेखागारातील दस्तऐवज, शासकीय ग्रंथालय, विभागीय व उपविभागीय ग्रंथालयातील पुस्तके इत्यादी ठिकाणावरून संशोधन सामग्री गोळा करण्याच्या प्रामाणिक प्रयत्न करण्यात येईल. तसेच आवश्यकता पडल्यास जाणकार व्यक्तीकडून माहिती मिळविण्यात येईल.

प्रकरण नियोजन :

"विदर्भातील विविध संस्था, मंडळे, दले यांचे भारतीय स्वातंत्र्य चळवळीत योगदान - एक अभ्यास" (१८८५-१९४७) या प्रस्तुत विषयाची मांडणी करण्यासाठी

वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक पद्धतीचा उपयोग करण्यात येणार आहे. त्यासाठी पुढील प्रमाणे प्रकरण नियोजन करण्यात आले आहे.

प्रकरण पहिले - विदर्भाचे भौगोलिक स्थान व विस्तार :

प्रस्तुत प्रकरणामध्ये 'विदर्भाचे भौगोलिक स्थान व विस्तार' या संबंधीचे मुद्दे विचारात घेतले जातील. विदर्भ हा महाराष्ट्रातील उत्तरपूर्व भागात आहे. त्याचे नागपूर व अमरावती असे दोन प्रशासकीय विभाग आहेत. त्या अंतर्गत बुलढाणा, अकोला, अमरावती, यवतमाळ, वाशिम, वर्धा, नागपूर, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, भंडारा अशा अकरा जिल्ह्यांचा समावेश होतो. विदर्भाचे एकूण क्षेत्रफळ ९७.३२१ कि. मी. आहे ते महाराष्ट्राच्या एकूण क्षेत्रफळापैकी ३१.६ % आहे. विदर्भाची लोकसंख्या २०११ च्या जनगणनेनुसार २,३०,०३,१७१ इतकी आहे. विदर्भाच्या सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, धार्मिक, गोष्टीचा आढावा प्रस्तुत प्रकरणात घेण्यात येईल.

प्रकरण दूसरे - विदर्भातील स्वातंत्र्य लढ्यातील विविध संस्था, मंडळे, दले यांच्या योगदानाची पार्श्वभूमी :

महात्मा गांधी, लोकमान्य टिळक, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, डॉ. पारसनीस, विठ्ठलराव कोरडे, दूर्गाताई जोशी, ब्रिजलाल बियाणी, पी. बी. गोळे, प्रमिलाताई ओक, ताराबेन मश्रुवाला, पार्वतीबाई पासरनीस या समाज सुधारकांच्या प्रबोधनामुळे विदर्भात मोठ्या प्रमाणात जागृती झाली. अनेक स्त्री-पुरूष शिराव घेऊ लागले. शिक्षणाच्या प्रसाराबरोबर अनेक स्त्री-पुरूष सामाजिक व राजकीय कार्य करण्यासाठी समोर येऊ लागले. त्यामुळे ग्रामीण व शहरी भागात विविध संस्था, मंडळे व दल स्थापन झाली. त्यामध्ये अनेक लोकांनी भाग घेऊन भारताला स्वातंत्र्य मिळविण्यासाठी प्रयत्न केले.

प्रकरण तिसरे - विदर्भातील विविध संस्था, मंडळे व दले यांचा अभ्यास :

भारताला स्वातंत्र्य मिळविण्यासाठी विदर्भात ग्रामीण व शहरी भागात विविध सामाजिक, धार्मिक, राजकीय, शैक्षणिक संस्था, मंडळे व दले यांची स्थापना झाली.

त्याद्वारे लोकांमध्ये सामाजिक प्रबोधन करून राजकीय हक्काची जाणीव निर्माण केली. त्यामध्ये प्रामुख्याने वऱ्हाड सार्वजनिक सभा, चरखा संघ, खामगाव येथील राष्ट्रीय शाळा, भगिनी मंडळ, वनिता समाज, महिला समाज, सरस्वती मंडळ, वऱ्हाड प्रांतिक युद्ध मंडळ, हिंदुस्थानी सेना दल, गौरक्षण सभा, अंजूमन-इ-इस्लाम, ग्राम संरक्षक दल, खादी भंडार, नाटक, मंडळ, विदर्भ हिंदुस्थानी सेवादल, शारदा समाज लेडिज क्लब, राष्ट्रीय स्वंय सेवक समिती, मनूताई कन्या शाळा, हनुमान व्यायाम मंडळ इत्यादींचा समावेश होतो.

प्रकरण चौथे - विदर्भातील विविध संस्था, मंडळे व दले यांचे भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील योगदान :

विदर्भात भारतीय स्वातंत्र्य चळवळ जनसामान्य पर्यंत पोहचविण्यासाठी संस्था, मंडळे व दले यांनी महत्त्वपूर्ण भुमिका बजावली आहे. ग्रामीण व शहरी भागात संस्था, मंडळे व दले या अंतर्गत जनसामान्य लोक एकत्र येऊन ब्रिटिशांना विरोध केला. प्रत्येक खेड्यात ग्रामपातळीवर वेगवेगळे मंडळे स्थापन झाली. त्यांनी स्त्री-पुरूषांमध्ये प्रबोधन करून राजकीय हक्काची जाणीव निर्माण केली.

प्रकरण पाचवे :

उपसंहार :

उपलब्ध मुळ व दुय्यम ऐतिहासिक साधनांच्या आधारे तथ्यांची मांडणी करून त्या दृष्टीने विश्लेषण करून निष्कर्ष काढण्यात येतील. त्यांची मांडणी येथे करण्यात येईल.

संदर्भग्रंथ सूची

मराठी संदर्भग्रंथ सूची :

१. उदासी बि. जा. अकोल्यातील राजकीय स्थित्यांतरे, शताब्दी स्मृतीग्रंथ अकोला.

२. ओक के. य. - स्मृतिच्या मशाली स्वातंत्र्य लढ्यातील अकोला जिल्ह्याचे योगदान, मशाली प्रकाशन समिती अकोला १९८६.

३. कानेटकर मा. ग. (संपा.) नागपूर प्रांताचा इतिहास, भाग - ३, कॉंग्रेस सुवर्ण जयंतीचा इतिहास, नागपूर १९३५.

४. कुटे भ. ग. - स्वातंत्र्य सैनिक चरित्र कोश, महाराष्ट्र राज्य विदर्भ विभाग, खंड - दूसरा, कार्यकारी संपादक व सचिव दर्शनिक विभाग महाराष्ट्र शासन - मुंबई.

५. कोरपे कुसुमताई - विदर्भातील नेतृत्वाची वाटचाल, अध्यक्ष दी अकोला जिल्हा मध्यवर्ती बँक लि. अकोला.

६. कंटक प्रेमा - सत्याग्रही महाराष्ट्र, सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला, पुणे.

७. कारंजकर भि. दे. - अमरावती शहराचा इतिहास, भाग - १, २, मुख्याधिकारी नगरपालिका अमरावती जिल्हा, अमरावती १९७८.

८. गोळे पु. ब. (सं) - वऱ्हाडची स्वातंत्र्य सेना १९२० ते १९३५, अकोला १९३५.

९. जाधव शोभना अनिल - भारतीय इतिहासातील स्त्रीया, पहिली आवृत्ती फडके प्रकाशन, कोल्हापूर.

१०. जोशी यशोदाबाई - आपला जीवन प्रवास, प्रथम आवृत्ती, व्हिनस प्रकाशन, पूणे १९६५.

११. देशपांडे अच्यूतराव - बुलढाणा जिल्ह्यातील स्वातंत्र्य लढा, ऑगस्ट क्रांती सुवर्ण महोत्सव समिती, मुंबई.

१२. देशपांडे ह. वा. - यावलीचा स्वातंत्र्य संग्राम, यावली शहिद स्मारक समिती, यावली १९४७.

१३. शिरसाट मोहन - वाशीम जिल्ह्याचा इतिहास, पहिली आवृत्ती, संकेत प्रकाशन, वाशिम २००४.

१४. पाठक दमयंती - वैदर्भिय महिलांचे स्वातंत्र्य संग्रामातील सहकार्य प्रथम आवृत्ती, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर २००३.

१५. फाटक न. र. - स्वातंत्र्य सैनिक चरित्र कोश, महाराष्ट्र राज्य विदर्भ विभाग खंड १ ला, कार्यकारी सचिव भारतीय स्वातंत्र्य आंदोलन इतिहास समिती कार्यालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

१६. येडेकर श्याम - भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील स्त्रियांचे योगदान महाराष्ट्र, प्रथम आवृत्ती, मंगला श्याम येडेकर काद्यवाडी रोड, कोल्हापूर.

१७. ढाले एन. डब्ल्यू - बुलढाणा जिल्ह्याचे भारतीय स्वातंत्र्य चळवळीत योगदान.

इंग्रजी संदर्भ ग्रंथ :

1. Home special Department file - Archives Department Mumbai.

2. Political and Military Department file - Archives Department Nagpur.

3. Gazetter of all Vidarbh District first edition Maharashtra state Bombay.

हिंदी संदर्भ ग्रंथ -

१. मिश्र भगवती प्रसाद - समर्पन और साधना, सस्ता साहित्य मंडळ प्रकाशन, नई दिल्ली १९७५.

२. सरकार सुमित / (अनु) डोताळ सुशिला - आधुनिक भारत, राजकमल प्रकाशन, नई दिल्ली.

वृत्तपत्र, साप्ताहिक, मासिक, वार्षीक अंक :

१. लोकसत्ता

२. लोकमत

३. सकाळ

४. भारतीय इतिहास आणि संस्कृती त्रैमासिक

५. भारत इतिहास संशोधन मंडळ त्रैमासिक

६. महाराष्ट्र साहित्य पत्रिका

७. विदर्भ संशोधन मंडळ वार्षिक

८. मराठवाडा संशोधन मंडळ वार्षिक

९. समाज प्रबोधन पत्रिका

१०. संशोधक

संशोधन मार्गदर्शक

डॉ. जी. एस. पिसे
सहाय्यक प्राध्यापक
इतिहास विभाग,
ज्ञानोपासक महाविद्यालय, परभणी

संशोधक विद्यार्थी

जिवन आसाराम तुपकर